# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 27/01/2024 (शनिवार) सकाळ

## केबल चोरी

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत डब्लू सी एल जूना मेन चेक पोस्ट कांद्री येथे दिनांक २४/०१/२०२४ चे २१/३० ते २२/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— संतोष इंद्रसान यादव, वय ३९ वर्ष, रा. मढीबाबा कॉलोनी कन्हान हा पेट्रोलींग करीत असता यातील **आरोपी नामे— १) विशाल २) नरेश उर्फ चाटीया दोन्ही रा. कांद्री** यांनी संगनमत करून वीजेचा पोल कापून नूकसान करून पळून गेल्याचे तसेच आरोपीतांनी याआधी चोरी गेलेला ट्रांसमीटर केबल २० फूट ५० एम एम किंमती २००००/— रू चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३७९, ४२७, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार सतिश फुटाणे मो. नं. ९५१८३३४७२३ हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. उमरेड :— अंतर्गत ०७ किमी अंतरावर मौजा ढोंबरा शेत शिवार येथे दिनांक २५/०१/२०२४ चे २२.०० वा. ते दिनांक २६/०१/२०२४ चे ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे—अमोल गंगाधर इंगळे, वय २८ वर्ष, रा. ढोबरा याने शेताची पाहणी केली असता शेतातील टॉवरचे वेस्टेज सामान व स्प्रिंकर लागलेले दिसुन आले नाही. टॉवरचे वेस्टेज सामान अंदाजे ४०० किलो किंमती ८०००/—रू. तर स्प्रींकरचे एकुण ४ नग किंमती १२०००/—रू. असा एकुण २००००/—रू. चा रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपी विरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक फौजदार वनिता सावरकर यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोहवा नरेंद्र पटले मो. नं. ९४२२८१२०८० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर